# <u>दोषारोप</u>

नि.फौ.ख.क्र. २२७/२०२१
शासन / लखन + १
निशाणी क्र. १६

मी पी.एस.ठाकरे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा याद्वारे तुमचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवत आहे.

१. लखन बाश पावार, वय ३० वर्षे,
२. पपली लखन पवार, वय २८ वर्षे,
रा. गारभवानी मंदरिजवळ, समता नगर परंडा,
ता. परंडा जि. उस्मानाबाद.

खालील प्रमाणे –

१) दिनांक २९.०६.२०२१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजताचे सुमारास परंडा शहरातील रुई रोड येथे तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन तुमचा समान उद्देश साध्य करण्याच्या उद्देशाने आरोपी क्र. १ याने चाकु वजा बतईने फिर्यादीच्या करंगळीवर मारुन जखमी करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र व माझे दखलपात्रतेतील अपराध केला.

२) उपरोक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी आपसात संगनमत करुन तुमचा समान उद्देश साध्य करण्याच्या उद्देशाने आरोपी क्र. २ ने फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ३२३ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र व माझे दखलपात्रतेतील अपराध केला.

३) उपरोक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादी कडुन सार्वजनिक शांतताभंग व्हावा अथवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने त्यांना प्रक्षोभित करुन अपमान केला आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र व माझे दखलपात्रतेतील अपराध केला.

४) उपरोक्त नमुद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपीने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी देवुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र व माझे दखलपात्रतेतील अपराध केला.

याद्वारे तुम्हास निर्देशित करण्यात येते की, उपरोक्त दोषारोप तुमचे विरुध्द माझे पुढे चालविण्यात येईल.

सही/–
( पराग स. ठाकरे)
दिनांक–२०.०४.२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त दोषारोप
आरोपीला वाचुन व समजावुन सांगण्यात आला.

सही/–
दिनांक–२०.०४.२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा